जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अधिनस्त विविध क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना ०५ निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः वाहन-२०२३/प्र.क्र.९८/ई-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२३.

**संदर्भ:-**

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय,क्र.जेपीएस-२०१४/प्र.क्र.०९/ई-८,दि.२१/०४/२०१६.
२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम,दि.२८/०७/२०२०.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८,दि.२७/०६/२०२२.
४) नियोजन विभाग, शासन ज्ञापन, क्र.डिपीए-१०२२/प्र.क्र.१३९/का.१४८१,दि.१६/०१/२०२३.
५) जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र.पसस/कावि/२३२/२०२३,दि.०९/०५/२०२३ व दि.०६/०७/२०२३.

**प्रस्तावना:-**

पुणे महसूल विभागातील “२०५३- जिल्हा प्रशासन” या लेखाशिर्षाखाली वेतन आहरित करणाऱ्या १०५ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भाधीन दि.२१/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भाधिन क्र. ०५ अन्वये त्यांच्या अधिनस्त विविध क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी यांना त्यांच्या जुन्या ०५ निर्लेखित वाहनाच्या बदल्यात नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

पुणे महसूल विभागातील जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अधिनस्त विविध क्षेत्रिय अधिकारी यांना या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या पूर्वीच्या जुन्या ०५ निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व त्या नवीन येणाऱ्या वाहनाकरीता प्रत्येकी रुपये ८.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.४०.०० लक्ष (अक्षरी रुपये चाळीस लक्ष फक्त) इतक्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे -

१. निधी उपलब्धतेनुसार शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दिनांक २८/०७/२०२० च्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या वाहनाकरीता प्रत्येकी रुपये ८.०० लक्ष च्या कमाल मर्यादेत ( वाहनाची किंमत + वस्तू व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मूल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भूत करुन ) वाहन खरेदी करण्यात यावी.
२. शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१/१२/२०१६ व क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४,दि.२४/०८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद निर्लेखित शासकीय वाहनांच्या बदली यापूर्वी नवीन वाहन खरेदी करण्यात आले नाही, या धारणेच्या अधिन राहून तसेच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नवीन वाहन खरेदीस शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्र "अ" मध्ये नमूद वाहनासाठी येणारा खर्च सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९४ जिल्हा आस्थापना (०१) उपविभागीय आस्थापना (०१) (०१) आयुक्त, पुणे (२०५३ ०१८२) १३-कार्यालयीन खर्च " **अथवा** महसूल व वन विभाग, शासन निर्णय,क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४०/ई-८,दि.२७/०६/२०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेतर्गत "गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण" या योजनेच्या माध्यमातून नियोजन विभागाने पुणे जिल्हयास सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या "मागणी क्र.ओ-२६, लेखाशीर्ष (२०५३ ए २३३) खालील ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३१९/२०२३/व्यय-९,दि.१९/१०/२०२३ व अनौपचारीक संदर्भ क्र.३९६/२०२३/विनियम,दि.२५/१०/२०२३ अन्वये त्या विभागाने दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३११३०१४५१३२६८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHRIRAM
DATTATRAYA
YADAV

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=9da0e03bd84c1e17d78ad320814d003150fbf7d2abd36f924e5705145bf0e270, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=50CB0CE4CC4FE54C74F42B860354E86EC00B3B36F5F215C9F7658E611006A200, cn=SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2023.11.30 14:51:26 +05'30'

**( श्रीराम यादव )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

विभागीय आयुक्त, पुणे.
जिल्हाधिकारी, पुणे.
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र,मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
उपविभागीय अधिकारी,मावळ-मुळशी.
तहसिलदार, पुणे/दौंड/मावळ/शिरुर.
वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/विनियम),मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती,( कार्यासन ई-८),महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

( शासन निर्णय, क्रमांकः वाहन-२०२३/प्र.क्र.९८/ई-८, सोबतचे सहपत्र-अ)

**पुणे महसूल विभागातील जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अधिनस्त विविध क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र**

| अ.क्र. | विभाग /जिल्हा | वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम | निर्लेखित वाहनाचा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | **पुणे विभाग (जिल्हा - पुणे)** | उपविभागीय अधिकारी,मावळ-मुळशी | एमएच-१२-एएच-७६०३ |
| २ | | तहसिलदार,पुणे | एमएच-१२-एएच-७६९१ |
| ३ | | तहसिलदार,दौंड | एमएच-४२-ए-६५७५ |
| ४ | | तहसिलदार,मावळ | एमएच-१२-आरआर-००६४ |
| ५ | | तहसिलदार,शिरुर | एमएच-१२-एएच-७०९३ |